# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक १३.०४.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून एकुण ६,२६००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४६६ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८८,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे वाडी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे वाडी हद्दीत, कृष्णा नगर, स्वामी समर्थ मंदीरजवळ, वडधामणा सुराबर्डी येथे फिर्यादीचे अपंग वडील सहेसराम बाजीराव केवट वय ६० वर्ष हे एकटेच राहतात ते अपंग असल्याने त्यांना शासनाकडून दरमहा मानधन मिळते. दिनांक १३.०४.२०२६ चे ००.३० वा. ते ०१.०० वा. चे दरम्यान, फिर्यादीचे वडील हे त्यांचे घरी असतांना आरोपी क्र. १) विलास सुभाष चौधरी वय २७ वर्ष २) जितेंद्र संतोष वगारे वय २५ वर्ष ३) प्रविण ढिल्लन चव्हाण वय २५ वर्ष सर्व रा. सुराबर्डी वस्ती, वडधामणा यांनी संगनमत करुन, पैसे चोरी करण्याचे उद्येशाने फिर्यादीचे वडीलाचे घरी गेले असता, फिर्यादीचे वडीलांनी आरोपींना विरोध केला यावरून आरोपींनी त्यांचे उशीने तोंड दाबून तसेच गळा दाबून त्यांना जिवे ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी सौ. रिमा हेमंत पटेल वय २२ वर्षे, रा. कृष्णा नगर, वडधामणा, सुराबर्डी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि उत्तम जायभाये ९५५२५३८०९८ यांनी आरोपीं विरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन त्वरीत दखल घेऊन आरोपींचा शोध घेऊन आरोपी क्र. १ यास अटक केली आहे. इतर आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे अजनी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १२.०४.२०२६ चे १८.४५ वा. चे सुमारास, अजनी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, ठवरे शाळेच्या बाजुच्या मैदानात, कौसल्यानगर येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचे ईसमाकडे जात असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रिंकू सोमेश्वर तितरमारे वय ३३ वर्षे, रा. गल्ली क्र. ३, अशपाक उल्ला मार्ग,

सावित्रीबाई फुले नगर, अजनी, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, आरोपीचे पॅन्टचे कंबरेत एक लोखंडी चाकु मिळून आल्याने किंमती २००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे अजनी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यू)

**पोलीस ठाणे हिंगणा** :– दिनांक १२.०४.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, अनिकेत उत्तमराव सोनटक्के वय १८ वर्षे, रा. भारतमाता नगर, न्यु नरसाळा रोड, हिंगणा, नागपुर हा त्याचे मित्रासोबत मौजा वेळाहरी येथे असलेल्या बावडी विहीरीजवळ फोटो काढण्याकरीता गेला होता. फोटो काढीत असतांना विहीरीत त्यांची चप्पल पडली. पाण्यात पडलेली चप्पल काढण्याचा प्रयत्न करीत असतांना त्याचा तोल जावुन तो पाण्यात पडून बुडाल्याने मरण पावला. फायर ब्रिगेडच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढुन पुढील कार्यवाही करीता एम्स हॉस्पीटल येथे पाठविण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी राज गोपाल सोनटक्के वय २१ वर्षे, रा. ब्रम्हा नगर, न्यु नरसाळा रोड, नागपुर यांचे सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे सपोनि संदेश नाडे ९९७५२४९४७३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे बेलतरोडी** :– कु. पुजा महादेव कोकाटे वय ३० वर्षे, रा. खापरी पुर्ववसन सेक्टर क्र. २८, दुर्गा देवी मंदीरजवळ, बेलतरोडी, नागपूर हया दिनांक ११.०४.२०२६ चे सकाळी ०८.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. आजपावेतो घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– गोरा, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



कु. पुजा

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**